# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

सी.आय.एन: U45200MH1974SGC017206

**पंजिबध्द कार्यालय :** "एफडीसीएम भवन" ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर-४४००३६

**Website:**www.fdcm.nic.in / Email:md@fdcm.nic.in,gmhqnag12@gmail.com


क्रमांक : प्रशा/आस्था-१/न.क्र. ५१४/प्र.क्र. ४४४/२०२२-२३/३०९४ नागपूर, दिनांक १४/१२/२०२३

## जाहिरात

**सेवानिवृत्त मुख्य वनसंरक्षक आणि वनसंरक्षक यांची सेवा विवक्षित कामांसाठी करार पध्दतीने घेणेबाबत**

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेडद्वारे सुरु असलेल्या नियोजन, औषधी वनस्पती प्रकल्प, प्रशिक्षण, व्यवस्थापन आराखडे अद्यावत करणे, महाराष्ट्र फॉरेस्ट इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन निर्मीती, चंद्रपूर व्याघ्र सफारी, चिराण माल विपणन, वानिकी विषयक कामे गोरेवाडा प्राणी संग्रहालय इत्यादी विवक्षित कामांसंदर्भात एक सेवानिवृत्त मुख्य वनसंरक्षक व एक सेवानिवृत्त वनसंरक्षक यांची कंत्राटी पध्दतीने सेवा प्राप्त करणे अभिप्रेत आहे.

या प्रयोजनार्थ ईच्छुक उमेदवारांकरीता सेवाविषयक व अनुभवाबाबत पुढीलप्रमाणे योग्यता असणे आवश्यक आहे.

**अनिवार्य योग्यता -**

१- एफडीसीएम मध्ये विभागीय व्यवस्थापक या पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव.

२- वन विभागात उपवनसंरक्षक (प्रा.) या पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव.

**ईष्ट (Desirable) योग्यता -**

३-वन विभागातील वन्यजीव किंवा संशोधन किंवा शिक्षण, प्रशिक्षण शाखा किंवा कार्य आयोजना या शाखेतील किमान १ वर्षाचा अनुभव.

४- कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे.

इच्छुक उमेदवारांनी खालील नमुन्यात अर्ज **दिनांक २२/१२/२०२३** पर्यंत ई-मेल द्वारे सादर करावा. प्राप्त अर्जाची छाननी करुन उक्त निकषांप्रमाणे पात्र ठरत असलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रित करण्यात येईल.

**पत्ता : व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि., एफडीसीएम भवन, ३५९/बी हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर-४४००३६**

(अर्जाचा नमुना)

**जाहिरात क्रमांक : प्रशा/आस्था-१/न.क्र. ५१४/प्र.क्र. ४४४/३०९४ नागपूर, दिनांक १४/१२/२०२३**

| | | |
|---|---|---|
| १. | अर्ज करावयाची श्रेणी (मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक) | |
| २. | अर्जदाराचे पूर्ण नाव | |
| ३. | जन्म दिनांक | |
| ४. | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ५. | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | |
| ६. | सेवानिवृत्तीच्या वेळी वेतनश्रेणी | |
| ७. | एफडीसीएम मध्ये विभागीय व्यवस्थापक या पदावर व्यतीत केलेला कालावधी व केलेली उल्लेखनीय कामे | |
| ८. | वन विभागाच्या वन्यजीव शाखेतील उपवनसंरक्षक (प्रा.) या पदावर शासकीय सेवेत व्यतीत केलेला कालावधी व केलेली उल्लेखनीय कामे | |
| ९. | वन विभागातील वन्यजीव किंवा वन संशोधन किंवा शिक्षण व प्रशिक्षण शाखा किंवा कार्य आयोजना शाखेतील वनसंरक्षक किंवा त्यावरील पदावर शासकीय सेवेत व्यतीत केलेला कालावधी व केलेली उल्लेखनीय कामे | |
| १०. | अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ११. | अर्जदाराचा पत्ता | |
| १२. | अर्जदाराचा ई-मेल | |

**प्रमाणपत्र**

मी याव्दारे प्रमाणित करतो की, सदर अर्ज सादर करतेवेळी माझ्या विरुध्द कोणतीही शिस्तभंग विषयक कार्यवाही किंवा फौजदारी खटला सूरु नाही, तसेच वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा असून त्यात तफावत आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**

**(संजीव गौड)**

**महाव्यवस्थापक (मुख्यालय)**